# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक ०१.०६.२०२६ सोमवार**

**१) ''ऑपरेशन थंडर'' अंतर्गत ठळक सांख्यीकीय कामगिरी :–**

दिनांक ०१ मार्च २०२४ ते ०१ जुन २०२६ दरम्यान, **''ऑपरेशन थंडर – एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत, नागपुर शहर पोलीसांनी एन.डी.पि.एस. कायद्यान्वये एकुण १०३७ गुन्हे दाखल केले आहेत. ज्यामध्ये १,३६६ आरोपींना अटक करण्यात येवुन, आरोपींकडुन २०.०४ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ व ईतर मुद्देमाल जप्त करण्यात आला. ज्यामध्ये १.५ टनाहुन अधिक अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहे.

गांजाचे एकुण १८४ कारवाईमध्ये १,३७० किलोग्रॅम गांजा जप्त करून, २६९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

एम.डी. चे एकुण १८२ कारवाई मध्ये ३२९ आरोपींना अटक करण्यात आलेली असुन, एकुण १४.२० कोटी किंमतीचे एम.डी. पावडर जप्त करण्यात आले. तसेच, ब्राऊन शुगर, चरस, एल.एस.डी., डोडा व अफु तस्करीविरोधात प्रभावीपणे कारवाई करण्यात आलेल्या आहेत.

ई–सिगारेट विरोधी मोहीमेअंतर्गत एकुण १८ आस्थापनावर छापामार कारवाई करून, त्यामध्ये ४८.४३ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नागपुर–पुणे पोलीसांच्या संयुक्त कारवाईमध्ये आंतरराज्यीय ई–सिगारेट पुरवठा साखळीचा पर्दापाश करण्यात आला. पुणे येथे केलेल्या कारवाईमध्ये ९२५ विदेशी ई–सिगारेट, निकोटीन लिक्वीड ई–सिगारेट, रोख रकमेसह एकुण १६.५६ लाखांचा मुद्देमाला जप्त करण्यात आलेला आहे.

या कारवाई सोबतच एकुण ७६२ व्यसनाधिन व्यक्तींची ओळख पटवुन त्यांचे समुपदेशन करण्यात आलेले आहे. १७ मान्यता प्राप्त व्यसनमुक्ती केंद्रांशी समन्वय साधुन उपचार व पुनर्वसन व्यवस्था मजबुत करण्यात आलेली आहे. व्यसनाधिन व्यक्तींना न्यायालयासमक्ष हजर करून, व्यसनमुक्ती व पुनर्वसन उपचाराकरीता पाठविण्यात आलेले आहे.

नागपुर शहर पोलीस ''ऑपरेशन थंडर'' चे अंमलबजावणी सोबतच व्यसनाधिन व्यक्तींचे पुनर्वसनावरही भर देवुन, त्यांना वेळोवेळी समुपदेशन करीत आहे.

**२) ''ऑपरेशन थंडर'' अंतर्गत जरीपटका पोलीसांची सर्वोत्तम कामगिरी :– ७ किलो ५६७ ग्रॅम एम.डी. पावडर चा साठा किंमती २,३७,८७,२९०/–रू. चा मुद्देमाल जप्त. एका आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर – एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ३१.०५.२०२६ चे १२.२० वा. ते १६.४५ वा. चे दरम्यान, जरीपटका पोलीसांनी गुप्त बातमीदारामार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, सापळा रचुन, पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत,

उप्पलवाडी, एसडीपिएल आश्रय बिल्डींग, ए विंग, फ्लॅट नं. १०३ येथे पंचासमक्ष एन.डी.पि.एस कायद्याचे तंतोतंत पालन करून, रेड कारवाई केली. फ्लॅट मध्ये हजर ईसमांस त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मझहर अली वल्द अकबर अली, वय ३० वर्षे, रा. आझाद नगर, पटेल मोबाईल शॉप जवळ, टेका नाका, पाचपावली, नागपुर असे सांगीतले. व त्याने मागील एक वर्षापासुन अशोक जयपुरकर यांचेकडुन नमुद फ्लॅट भाड्याने घेवुन राहत असल्याचे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, ०२ मोबाईल फोन मिळुन आले. त्याचे फ्लॅटची झडती घेतली असता, बेडरूमला लागुन असलेल्या बाथरूममध्ये एका प्लास्टीक पोत्याखाली नायलॉन पिशवीमध्ये १४ झिपलॉक पन्नीमध्ये एम.डी. पावडर मिळुन आली. एम.डी. पावडरचे एकुण वजन केले असता, ७ किलो ५६७ ग्रॅम असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस एम.डी. पावडर बाबत विचारपुस केली असता, त्याने नमुद एम.डी. पावडर ही त्यास उत्तर प्रदेश येथुन आलेल्या एका ईसमाने सि.ए. रोड येथे आणुन दिल्याचे सांगीतले. व त्याने त्याचे सोनेट कंपनीची कार क्र. एम.एच. २४ बि.एल. ९९५० ने फ्लॅटमध्ये आणल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल फोन, सोनेट कार, ईलेक्ट्रीक वजन काटे, पासबुक, व ईतर साहीत्य असा एकुण २,३७,८७,२९०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता साठवणुक करून समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीने एम.डी. पावडरचा साठा नेमका कोठुन आणला व तो कोणाकोणाला विक्रीकरीता देणार होता, यापुर्वी सुध्दा त्याने कोणास विक्री केली आहे का? व त्याचे ईतर साथीदार याबाबत पुढील तपास जरीपटका पोलीस करीत आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनिता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, सपोनि. आशिष मोरखडे, पोउपनि. अनंता गारमोडे, पोहवा. रमेश यादव, नितीन राणे, अतुल शिरभाते, मुकुंद सुर्यतळ, पोअं. पंकज वरकड, राकेश सिंग, मंगेश दोनाडकर, नितेश नागपुरे, प्रतीक चितारी व मपोहवा. प्रियंका यांनी केली.

**३) नागपूर-पुणे पोलिसांची संयुक्त कारवाई :- बेकायदेशीर ई-सिगारेट पुरवठा साखळीचा पर्दाफाश, 16.56 लाखांचा मुद्देमाल जप्त**

केंद्र शासनाने इलेक्ट्रॉनिक सिगारेट प्रतिबंध अधिनियम, 2019 अंतर्गत ई-सिगारेटचे उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, साठवणूक, वितरण, विक्री आणि जाहिरातीस प्रतिबंध घातला असतानाही नागपूर शहरात काही ठिकाणी त्यांची विक्री सुरू असल्याची माहिती समोर आली होती. त्यानुषंगाने नागपूर पोलिसांनी मागील वर्षभरात शहरातील विविध आस्थापनांवर कारवाया करून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित ई-सिगारेट जप्त केल्या होत्या. टेक्सास, मैफिल, नॉन्सेन्स यांसह विविध आस्थापनांवर करण्यात आलेल्या कारवायांमधून या बेकायदेशीर व्यापाराचे स्वरूप उघड झाले होते.

नागपूर गुन्हे शाखेच्या एनडीपीएस पथकाने मैफिल पान सेंटरवर कारवाई करून चालक शुभम कांबळे याच्या ताब्यातून 122 ई-सिगारेट जप्त केल्या. या प्रकरणी पाचपावली पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक 266/2026 अन्वये इलेक्ट्रॉनिक सिगारेट प्रतिबंध अधिनियम, 2019 मधील कलम 4, 5, 7 आणि 8 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाईनंतर पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, नागपूर यांनी किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता, संपूर्ण पुरवठा साखळी उघड करण्याचे निर्देश दिले. तपासादरम्यान नागपूरसह इतर ठिकाणी विक्री होणाऱ्या प्रतिबंधित ई-सिगारेटचा पुरवठा पुणे येथून होत असल्याचे निष्पन्न झाले. या माहितीच्या आधारे नागपूर

पोलिसांचे विशेष पथक पुण्याकडे रवाना करण्यात आले. तपासात मोआझ एजाज खान, वय 32 वर्षे, रा. फ्लॅट क्रमांक 8, गंगा दर्शन हाउसिंग सोसायटी, आयबीएम कंपनी जवळ, नगर रोड, येरवडा, पुणे हा या पुरवठा साखळीतील महत्त्वाचा दुवा असल्याचे निष्पन्न झाले. नागपूर शहर पोलीस आणि पुणे शहर पोलीस गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने माहितीच्या आधारे पुण्यातील बोट क्लब परिसरातील न्यू इंडिया बेकरी येथे छापा कारवाई केली. नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल आणि पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. छाप्यामध्ये पंचांसमक्ष मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित साहित्य, रोख रक्कम व अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल :- प्रतिबंधित विदेशी ई-सिगारेट – 356 नग किंमत : ₹8,78,400, वेगवेगळ्या कंपनीचे ई-सिगारेट लिक्विड – 22 नग किंमत : ₹8,800, लेखी व चित्रमय आरोग्य इशारा नसलेल्या विदेशी सिगारेट – 569 नग किंमत : ₹73,070, रोख रक्कम किंमत : ₹6,66,310, दोन मोबाईल फोन किंमत : ₹30,000 एकूण जप्त मुद्देमाल ₹16,56,580/- .

कारवाईमधून प्रतिबंधित ई-सिगारेटचा पुरवठा, साठवणूक, आर्थिक व्यवहार आणि वितरण यंत्रणा याबाबत महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्य, आर्थिक व्यवहारांची नोंद आणि डिजिटल पुराव्यांच्या आधारे या रॅकेटशी संबंधित इतर व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे. देशात प्रतिबंधित असलेल्या ई-सिगारेटचा पुरवठा नेमका कोणत्या मार्गाने होत आहे, त्यामागील मुख्य पुरवठादार कोण आहेत, तसेच या साखळीचे इतर दुवे कोणते आहेत याचा तपास सुरू असून, लवकरच आणखी महत्त्वपूर्ण माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

सार्वजनिक आरोग्याशी संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि संघटित बेकायदेशीर व्यापारावर आळा घालण्यासाठी नागपूर व पुणे पोलिसांमधील समन्वयाचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रतिबंधित ई-सिगारेटच्या उत्पादन, वाहतूक, साठवणूक, वितरण आणि विक्रीमध्ये सहभागी असलेल्या प्रत्येक घटकावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात प्रतिबंधित ई-सिगारेटच्या बेकायदेशीर व्यापाराला कोणतेही स्थान नाही. राज्यातील कोणतेही शहर अशा बेकायदेशीर कारवायांचे केंद्र बनू दिले जाणार नाही. नागपूर आणि पुणे पोलिसांची ही संयुक्त कारवाई अशा प्रकारच्या नेटवर्कमध्ये सहभागी असलेल्या घटकांना स्पष्ट इशारा असून, अशा साखळ्यांतील प्रत्येक दुवा शोधून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.